# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.७/२०२६** **दिनांक ०१/०९/२०२६**
**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०१.०९.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/२०४३/२०२६ दि.२८.०८.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०१.०९.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

मा.श्री. शिवाजी कचरे,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

**विषय नं.१** **दि.०४.०८.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३५५** **दि.०४.०८.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभा कामकाज विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील शांतीनिवास व भक्तनिवास या इमारतीमधील दर्शनरांगेचे व कार्यालयांचे महिला तसेच पुरुष स्वच्छतागृहांचे नुतनीकरण करणेसाठी प्राप्त ई-निविदांपैकी निम्नतम निविदाधारक सुधीर विठ्ठलराव कातोरे, संगमनेर यांची रु.३५,०९,०४१/-मात्रची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३५६/१** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**२. मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे यांचे सन २०२६-२७ करीता साखर पुरवठयाबाबत.**

**निर्णय क्र.३५६/२** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३** **नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ कालावधीत शिर्डी येथे येणा-या भाविकांच्या वाहतूक सुविधेसाठी संस्थानतर्फे साईनगर रेल्वे स्टेशन, शिर्डी येथून दक्षिणबाजुचा चारी क्र.११ पर्यंतचा रस्ता विकसीत करणेसाठी तत्वत: मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५७** **सदर रस्ता विकसित करण्याचा प्रस्ताव मुख्यतः सन २०२७ मधील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहतूक सुविधेच्या उद्देशाने सादर करण्यात आला आहे. तथापि, प्रस्तावित रस्त्यासाठी रेल्वे विभागाची ना-हरकत मिळविणे, खासगी जमिनींचे भूसंपादन करणे, आवश्यक मान्यता प्राप्त करणे व त्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण करणे या बाबी अद्याप प्रलंबित आहेत. कुंभमेळ्यासाठी उपलब्ध कालावधी विचारात घेता, या सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन रस्ता भाविकांच्या वापरासाठी वेळेत खुला होईल, याबाबत प्रस्तावातून खात्री होत नाही.**

**त्यामुळे भूसंपादनासह प्रकल्पाचा एकूण अपेक्षित खर्च, जमीन उपलब्ध होण्याची संभाव्य मुदत, आवश्यक मान्यता व निविदा प्रक्रियेचा कालावधी आणि प्रत्यक्ष काम पूर्ण करण्याचे टप्पेनिहाय वेळापत्रक यांचा समावेश असलेला व्यवहार्य, कालबद्ध आराखडा सादर करावा. या रस्त्याची दीर्घकालीन उपयुक्तता स्वतंत्रपणे स्पष्ट करावी. तोपर्यंत सल्लागार नियुक्ती व खर्चास तत्त्वतः मान्यता देण्याचा निर्णय स्थगित ठेवण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४** **नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ कालावधीत शिर्डी येथे येणा-या भाविकांच्या वाहतूक सुविधेच्या दृष्टीने संस्थानतर्फे अहिल्यानगर-मनमाड रस्त्याच्या पूर्व बाजूस असलेली चारी क्र.११ बंदिस्त करुन साईनगर रेल्वे स्टेशनकडे जाणा-या प्रस्तावित पोहोच रस्त्यापर्यंतचा रस्ता विकसीत करण्यास तत्वत: मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५८** प्रस्तावित सुविधा सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी उपलब्ध होतील, याची खात्री होत नाही. दोन्ही कामांचा एकत्रित खर्च, पूर्वअटींची सद्यस्थिती, टप्पेनिहाय निश्चित कालमर्यादा आणि संपूर्ण मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची अंतिम तारीख दर्शविणारा व्यवहार्य आराखडा सादर करावा. तोपर्यंत सल्लागार नियुक्ती व खर्चास तत्त्वतः मान्यता देण्याचा निर्णय स्थगित ठेवण्यात येत आहे. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१९८, १९९,२०० व २०१ मध्ये Amusement Park / Family Entertainment Park विकसीत करणेसाठी सल्लागार नेमणूकीकरीता e-RFP प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५९** प्रस्ताव नामंजूर.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६** **श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण बाजूस असलेल्या खुले नाटयगृहाचे समोरील जागेत साई भक्तांचे सुविधेकरीता टेंन्साईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणे व इतर अनुषंगीक कामे करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६०** **स्थळ पाहणी करुन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** **शिर्डी येथील श्री साईबाबा परिक्रमा मार्गाचे रुंदीकरण (९.०० मी.) करुन कॉंक्रिटीकरण करण्यासाठी तसेच सदर प्रकल्पाकरीता सल्लागार नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६१** **स्पिरिच्युअल कॉरीडॉर विषय प्रस्तावीत असल्याने सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८** **व्दारावती भक्तनिवास येथील पहिल्या व दुस-या मजल्यावरील खोल्यांचे रंगकाम करणे कामाचे ठेकेदार बी.आर.आनंद, छ.संभाजीनगर यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**निर्णय क्र.३६२** सदर काम पूर्ण करण्याची करारानुसार अंतिम मुदत दि. ०८/०७/२०२६ होती. तथापि, ठेकेदाराने मुदतवाढीची मागणी दि. २०/०७/२०२६ रोजी, म्हणजे मूळ मुदत संपल्यानंतर १२ दिवसांनी केली आहे. रामनवमी उत्सव व अन्य कार्यक्रमांमुळे खोल्या उपलब्ध होत नसल्याची अडचण काम सुरू असतानाच निदर्शनास आली असल्याने, ठेकेदाराने त्याबाबत वेळेत लेखी कळवून मूळ मुदत संपण्यापूर्वीच मुदतवाढ मागणे व त्यावर सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी प्राप्त करून घेणे अपेक्षित होते.

त्यामुळे ठेकेदाराने मुदतीत अर्ज का केला नाही, याचा खुलासा मागवावा. तसेच, बांधकाम विभागाने कामाच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेत असताना मुदत संपण्यापूर्वीच ही बाब निर्णयासाठी का सादर केली नाही, हेही स्पष्ट करावे. यापूर्वी ठेकेदाराने अडचणींबाबत कोणताही लेखी पत्रव्यवहार केला असल्यास तो सादर करावा. केवळ मुदतवाढीचा अर्ज प्राप्त झाला म्हणून मुदतवाढ मंजूर झाल्याचे मानता येणार नाही.

ठेकेदाराने मूळ मुदत संपल्यानंतर मुदतवाढीचा अर्ज सादर केल्याची कारणे, यापूर्वी केलेला पत्रव्यवहार, खोल्या प्रत्यक्ष उपलब्ध नसल्याचा कालावधी, विलंबासाठीची जबाबदारी आणि करारातील मुदतवाढ व दंडासंबंधी अटी यांची पडताळणी करून बांधकाम विभागाने स्पष्ट अभिप्रायासह सुधारित प्रस्ताव सादर

करावा. त्यामध्ये मुदत संपल्यानंतर मागितलेली मुदतवाढ मंजूर करण्याची कारणमीमांसा व आवश्यक कालावधी स्पष्ट करावा. तोपर्यंत प्रस्तुत प्रस्तावावरील निर्णय स्थगित ठेवण्यात येत आहे.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.९** **साईआश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळाकरीता नवीन फायर सिलेंडर खरेदी करणेकामी न्युनतम दरधारक मे. लिटमस इंटरप्रायझेस, भांडूप यांचा कार्यादेश व चालू असलेली कोटेशनव्दारे खरेदी प्रक्रिया रद्द करणेस तसेच नव्याने नामांकित कंपनीचे फायर सिलेंडर खरेदी करणेकामी सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६३** मे. लिटमस इंडस्ट्रीज, भांडूप यांनी वारंवार मुदतवाढ देऊनही अग्निशामक सिलेंडरचा पुरवठा केलेला नाही. अग्निसुरक्षेशी संबंधित अत्यावश्यक साहित्याच्या पुरवठ्यातील हा विलंब गंभीर आहे. त्यामुळे केवळ कार्यादेश रद्द करण्यापुरती कार्यवाही प्रस्तावित न करता, संबंधित पुरवठाधारकाविरुद्ध करारानुसार अन्य कार्यवाही करण्याबाबत विभागाने स्पष्ट अभिप्राय सादर करावा. काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही का प्रस्तावित केलेली नाही, याचाही खुलासा करावा. याबाबत लागू नियम व कराराच्या अटी विधी विभागाकडून तपासून, प्रस्तावित काळ्या यादीतील समावेशाचा स्पष्ट उल्लेख असलेली कारणे दाखवा नोटीस देणे व उत्तराची संधी देऊन पुढील निर्णय घेणे यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.

सध्याच्या प्रस्तावात नमूद कंपन्या व MAP ९०% पावडरचा गुणवत्ता निकष पूर्वीच्या खरेदी प्रक्रियेत समाविष्ट होता काय, हे मूळ कोटेशनच्या अटींसह स्पष्ट करावे. पूर्वीच्या व सध्याच्या कंपन्यांतील बदल, तांत्रिक वैशिष्ट्ये आणि वाढीव दर यांची तुलनात्मक माहिती द्यावी. विशिष्ट कंपन्यांची निवड करण्यामागील वस्तुनिष्ठ तांत्रिक कारणेही नमूद करावीत.

तसेच, पूर्वी आवश्यक दर्शविलेली ४२२ सिलेंडरची संख्या आता ३१० करण्याचा आधार स्पष्ट करावा. प्रतिमजला सहाऐवजी चार सिलेंडर उपलब्ध केल्याने अग्निसुरक्षेची आवश्यकता पूर्ण होते काय, याबाबत सक्षम अग्निसुरक्षा अधिकाऱ्याचा अहवाल सादर करावा. केवळ वाढीव खर्च मर्यादित ठेवण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपकरणांची संख्या कमी केली जाणार नाही, याची खातरजमा करावी.

वरील खुलासे व कागदपत्रांसह सुधारित खरेदी प्रस्ताव तातडीने सादर करावा. पुरवठाधारकाविरुद्धच्या कार्यवाहीमुळे आवश्यक अग्निसुरक्षा व्यवस्था प्रलंबित राहणार नाही, यासाठी उपलब्ध उपकरणांची कार्यक्षमता तपासून आवश्यक अंतरिम सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करावी. **(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.१० श्री साईबाबा हॉस्पिटल येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्तापित करणेकामी प्रकल्प ठेकेदार मे.काहाळे इन्फ्राकॉन प्रा.लि., चंद्रपुर यांना मुदतवाढ देणे तसेच सदर प्रकल्पाकरीता आवश्यक अग्निशमन यंत्रणेकरीता पाण्याचे टाकीचे फाऊंडेशन रचनेतील बदलाबाबत.**

**निर्णय क्र.३६४** अग्निशमन पाण्याच्या टाकीसाठी निश्चित केलेल्या मूळ जागेखालून भूमिगत जलवाहिनी/चारी गेल्याची बाब कामाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यावर निदर्शनास आली आहे. निविदा व मूळ आराखडा तयार करण्यापूर्वी जागेची उपलब्धता, भूमिगत सेवा आणि संरचनात्मक व्यवहार्यता यांची पडताळणी करण्यात आली होती काय, याचा सल्लागार व संबंधित विभागांनी खुलासा करावा.

तसेच, मूळ आय-बीम संरचनेऐवजी आता आर.सी.सी. फाउंडेशन सुचविण्यामागील तांत्रिक कारणे पूर्वी विचारात का घेतली गेली नाहीत, हे स्पष्ट करावे.

टाकीच्या जागेतील व रचनेतील बदलामुळे प्रत्यक्ष किती विलंब झाला आणि पंप, अलार्म, आय.सी.सी.यू., जी.आय.सी.यू., ओ.टी. व अन्य कामांपैकी कोणती कामे या बदलापासून स्वतंत्रपणे पूर्ण करणे शक्य होते, याचा कामनिहाय अहवाल सादर करावा.

ठेकेदाराने मागितलेल्या १२० दिवसांच्या मुदतवाढीस सल्लागाराने अनुकूल अभिप्राय दिला असताना, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ६० दिवसांची मुदतवाढ प्रस्तावित केली आहे. तरी त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, साहित्याची उपलब्धता, सुधारित आराखड्यांची मंजुरी, समांतर कामांचे नियोजन आणि चाचण्या यांचा विचार केलेले व्यवहार्य वेळापत्रक आवश्यक आहे. ते ठेकेदार व सल्लागाराकडून प्रमाणित करून घ्यावे.

सुधारित संरचनात्मक आराखडा, आवश्यक तांत्रिक पडताळणी आणि मूळ व सुधारित BOQ यांची तुलनात्मक खर्चपत्रके सादर करावीत. केवळ दरवाढ नसल्यामुळे एकूण खर्च वाढणार नाही, असे गृहीत धरता येणार नाही

मुदतवाढीचा प्रारंभ व अंतिम तारीख स्पष्ट करून विलंबाची जबाबदारी आणि करारातील संबंधित अटींनुसार निर्णय प्रस्तावित करावा.

**(कार्यवाही- फायर अ‍ॅन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.११ सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता परकीय चलन विषयक कामकाजासाठी अनुभवी तज्ञ सल्लागार नेमणुक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६५ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१२ एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.३६६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१३ संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तूची तपासणी करुन मुल्यांकन करणेकामीचे कामकाज संस्थानचे लेखाशाखेकडील तीन कायम कर्मचारी यांचेकडून करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३६७ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१४ श्री साईबाबा संस्थान पाणी पुरवठा विभागातील सन २०२३-२४ व २०२४-२५ मधील आर्थिक अनियमिततेबाबत प्रशासकीय चौकशी बाबत.**

**निर्णय क्र.३६८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१५ श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे पालखी घेऊन पायी चालत येत असतांना अपघाती मयत झालेल्या साईभक्त पदयात्री यांचे वारसांना संस्थानमार्फत रक्कम रु.दोन लाख मात्र आर्थिक मदत देणे तसेच सध्याचे विमा योजनेचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर दि.२६.०३.२०२७ पासून सदरहु योजना संस्थानमार्फत सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६९ प्रस्ताव स्थगित.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१६ गृहमंत्रालय, भारत सरकार (FCRA) यांचे अधिसुचनेअंतर्गत संस्थेस लागू विशिष्ट उद्दिष्टे निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१७ संस्थानला सोने वस्तू वितळविणेसाठी मान्यता मिळालेले सोने दागिने इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडे वितळविणे व पूर्वीचे मंजूर सोने नाणी तयार करुन घेणेची संख्या सुधारित करणे व जादा येणारे खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.३७१** **पुनर्विचार याचिकेमध्ये संस्थान मार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करायचे आहे, असे ॲड. श्री. बजाज, छ. संभाजीनगर यांनी संस्थानला कळविले आहे. प्रतिज्ञापत्र दाखल न करता प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. ॲड. श्री जयकर, मुंबई व ॲड. श्री बजाज यांचेकडुन याबाबतीत लेखी मत घेतल्यानंतरच प्रस्ताव पुनर्विचारासाठी दाखल करावा. दरम्यान शासन निर्णय दिनांक २५.०७.२०१७ मध्ये सोन्याच्या भावामध्ये झालेल्या वाढीमुळे शुध्द सोन्यातून ५, १० ग्रॅम नाणी, २.५, ५ व १० ग्रॅम पेंडंट प्रमाणे अंशत: बदल करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१८** **माहे जुलै-२०२६ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३७२** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छता, हाऊसकिपींगचे कामकाज आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी स्वच्छता कर्मचारी व वैद्यकीय पेशाशी संलग्न असणारे कर्मचारी पुरविणेबाबतची ई-निविदा फेर प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७३** **प्रस्तुत ई निविदेचा विषय दिनांक २०.१२.२०२५ रोजी चक्रिय पध्दतीने मंजूर झालेला असून विहित कार्यपध्दती अवलंबुन ई निविदा प्रक्रिया राबवली आहे. दिनांक १६.०३.२०२६ रोजी तांत्रिक बिड उघडण्यात येवुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १७.०६.२०२६ रोजी मान्यता दिल्यानंतर वाणिज्य निविदा उघडण्यात आल्या. त्यामध्ये एल-१ यांनी दिलेले दर अंदाजित किंमतीपेक्षा खरेदी नियमावली मध्ये नमुद असलेल्या दरापेक्षा 3% ने जास्त आहेत. याबाबती एल-१ यांचे प्रतिनिधी सोबत दिनांक २२.०७.२०२६ रोजी चर्चा झाल्याचे दिसून येत आहे. दिनांक २८.०७.२०२६ रोजी एल-१ निविदाधारक यांचेकडून प्राप्त ईमेलचे संदर्भाने खुलासा दिनांक ०३.०८.२०२६ रोजी तयार केलेला खुलासा एल-१ निविदाधारकास कळविण्यात येवुन एल-१ निविदाधारकास दर 3% ने कमी करण्यास कळविण्यात यावे व त्यानंतर फेरनिविदा प्रकाशित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२० बी.ए.एम.एस. पात्रता धारक वैद्यकीय अधिकारी यांची व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७४** संस्थान रूगणालयामध्ये स्थायी डॉक्टरांची पदे भरणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात यावा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक ४ जुलै २०१९ अन्वये गट अ संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने MBBS अर्हता धारकांमधुन प्राधान्याने भरण्यात यावे असे अपेक्षित आहे. MBBS वैद्यकीय अधिकारी यांची स्थायी पदे भरेपर्यंत रिक्त १२ पदांवर Visiting पध्दतीने MBBS पात्रताधारक यांची नेमणूक करता येईल. जाहिरात प्रसिध्द होवुन MBBS पात्रताधारक वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झालेले नसल्यास, BAMS पात्रताधारक यांची संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन कंत्राटी पध्दतीने नेमणुक देण्यात यावी.

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१ सेवानिवृत्तीनंतर वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ (Senior Intensivist) या पदावर पुनर्नियुक्ती मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३७५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२२ डॉक्टर ऑफ फॉर्मसी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना 'वॉर्ड राऊंड्स' मध्ये सहभागी होऊन प्रत्यक्ष क्लिनिकल अनुभव घेणेसाठी प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसी, प्रवरानगर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये सामंजस्य करार करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६** प्रस्तुत प्रस्ताव हा केवळ विद्यार्थ्यांना रुग्णालयात प्रशिक्षणाची परवानगी देण्यापुरता मर्यादित नसून, बाह्य शैक्षणिक संस्थेशी सामंजस्य करार करून संस्थेच्या दोन्ही रुग्णालयांतील रुग्णसेवा, वैद्यकीय विभाग, मनुष्यबळ व पायाभूत सुविधा विद्यार्थ्यांच्या क्लिनिकल प्रशिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याशी संबंधित आहे. त्यामुळे हा विषय संस्थेच्या दीर्घकालीन धोरणाशी संबंधित धोरणात्मक बाब असल्याचे दिसून येते.

प्रस्तावात विद्यार्थ्यांची संख्या, प्रशिक्षणाचा कालावधी, रुग्णांची गोपनीयता व संमती, वैद्यकीय नोंदींचा वापर, विद्यार्थ्यांवरील देखरेख, अपघात अथवा व्यावसायिक चुकीची जबाबदारी, विमा संरक्षण, संस्थेच्या सुविधांच्या वापराचा मोबदला आणि करार समाप्तीच्या अटी यांचा स्पष्ट तपशील उपलब्ध नाही. प्रस्तावित सामंजस्य कराराचा मसुदाही सादर केलेला नाही.

सध्या कार्यरत तदर्थ समितीचे स्वरूप आणि प्रस्तुत विषयाचे धोरणात्मक व दीर्घकालीन परिणाम विचारात घेता, या टप्प्यावर प्रस्तावास मान्यता देणे उचित होणार नाही. आवश्यक बाबींचा सविस्तर अभ्यास करून, विधी विभागाचा अभिप्राय व सामंजस्य कराराचा संपूर्ण मसुदा तयार ठेवावा. त्यानंतर हा विषय नियमित व्यवस्थापन समिती अथवा सक्षम धोरणनिर्धारक प्राधिकरणासमोर निर्णयासाठी सादर करावा.

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२३** **श्री.बारकुसिंग शेकुसिंग राजपुत (लिपीक-टंकलेखक,लेखाशाखा विभाग) व श्री.संतोष दामोधर चाबुकस्वार (मदतनीस, प्रसादालय विभाग) यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबतचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३७७** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२४** **श्री. शेषराव राधाकृष्ण कुलभैय्या,स्थायी (कायम) कॅथलॅब टेक्निशियन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.३७८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२५** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२६ ते जून-२०२६ मध्ये अंतर्रुग्ण व बाहयरुग्णांवर करण्यात आलेल्या रु.९,१५,१३,६१५/- वैद्यकीय उपचाराची व त्यामध्ये देण्यात आलेल्या रु.७,३९,७९,१९९/- सवलतीची लेखाविषयक नोंदी घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३७९** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२६ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८०** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२७** **लोधी रोड, नवी दिल्ली येथे श्रींच्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८१** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२८** **सन-२०२६ दिपावली निमित्त श्री साईबाबा महाविद्यालयातील तासिका तत्वावरील सहाय्यक प्राध्यापक यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८२** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार १) श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता, औद्योगिक प्रशिक्षण संस्था २) श्री.नवनाथ भाऊसाहेब कोते, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त) ३) श्री.प्रकाश दादा क्षीरसागर, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त) यांचे समग्र चौकशीबाबत.**

**निर्णय क्र.३८३** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३०** **श्री.अर्जुन सुकदेव फटांगरे, लिपीक-टंकलेखक, सामान्य प्रशासन विभाग यांनी मा.अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दिनांक २९.०४.२०२६ रोजी केलेल्या अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३८४** **अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले. अपिल दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे. दि.११/१०/२०२४ रोजी एक वार्षिक वेतनवाढ रोखण्याचा झालेला निर्णय रद्द करण्यात येत आहे.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१ इनसोर्स अकुशल कंत्राटी कर्मचारी कुशल करणेकामी परीक्षा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३८५ तहकुब.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३२ शासन अधिनियम-२०१७ अन्वये कंत्राटी कर्मचा-यांना अर्जित रजा/सुट्टया लागु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.३३ श्रींचे समाधी मंदिर, व्दारकामाई मंदिर, मंदिर परिसर व संस्थानचे इतर विभागाचे ठिकाणी चित्रीकरण परवानगी बाबत.**

**निर्णय क्र.३८७ तहकुब.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.३४ श्री साईबाबांच्या समाधी मंदिरात प्रसाद घेऊन जाणेस परवानगीबाबत.**

**निर्णय क्र.३८८ तहकुब.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.३५ मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने बाजू मांडणे करीता संस्थानचे पॅनलवर विनामुल्य सेवा घेणेकामी अॅडव्होकेट नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८९ प्रस्तावातील नमुद अ.नं.४,५,१०,२१ व २८ यांची संस्थानचे वतीने बाजू मांडणे करीता संस्थानचे पॅनलवर विनामुल्य सेवा घेणेकामी अॅडव्होकेट म्हणून नियुक्ती करण्यात यावी.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.३६ श्री.अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थान मालकीची मौजे निमगाव को-हाळे येथील साईप्रसादालय इमारतीतील ७२०० चौ.फुट बांधीव जागा लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेली असून सदर जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत तसेच प्रदर्शन पाहणी शुल्कात वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९० तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३७ महाराष्ट्र राज्य कामगार विमा सेवा सोसायटीचा दवाखाना संस्थान परिसरात सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९१ तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३८ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना साईउद्यान परिसरात लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या मोकळया जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३९२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३९ सन २०२६-२७ मध्ये आयोजित होणा-या १४ वर्षाखालील मुले व मुली शालेय राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे श्री साईबाबा शैक्षणिक संकुलामध्ये आयोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल)**

---

**विषय नं.४० सन २०१९-२० मध्ये मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.७,५०,०००/-जप्त करणे व त्यांना पुढील ०३ वर्ष कालावधीकरीता काळया यादीत समाविष्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९४ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.४१** **शिर्डी नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परीक्षण अहवाल नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९५** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगी आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **संस्थानचे शिर्डी सर्व्हे नं.५४,५५ या वाहनतळावर साई भक्तांचे सुविधेकरीता नवीन टॉयलेट ब्लॉकचे बांधकामाचे ठेकेदार संकेत लक्ष्मण वाणी, कोपरगाव यांना कुठलीही भाववाढ/दरवाढ न देता काम पूर्ण करण्यासाठी दि.३१.१०.२०२६ अखेर मुदतवाढ देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३९६** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **मौजे शिर्डी, ता.राहाता येथील सर्व्हे नं.१९५/४ पै. व सर्व्हे नं.१९५/५ मधील ०.२० आर क्षेत्र रस्त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी कायम खरेदी घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९७** **सहा. संचालक, नगररचना, सहा.दुय्यम निबंधक यांचेकडून जमिनीचे मुल्यांकन प्राप्त करुन घेण्यात येऊन तुलनात्मक तक्ता सादर करावा.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**निर्णय क्र.३९८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४**

**निर्णय क्र.३९९** **शिर्डी येथील स.नं.५५ मधील सुधारित विकास आराखडयातील आरक्षण क्र.१२ बेघरांसाठी घरे या सन १९९२ पासून प्रलंबीत असलेल्या आरक्षणाचा पुनर्विचार करुन ते रद्द करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणेबाबत चर्चा झाली. त्या अनुषंगाने यापुर्वी मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/९१/२०१९, दि. ६/४/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु त्यास अद्याप मंजूरी नाही, यास्तव स्मरणपत्र पाठविण्यात यावे.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.३५५ ते ३९९ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.५.४५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(शिवाजी कचरे)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**